अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– २०/०५/२०२५

## —: प्रेसनोट :—

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | १९/२०२५ |
| कलम | कलम ७ भ.प्र.अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | श्री. विकास रामचंद्र कोरडे, सहकारी अधिकारी श्रेणी-२, उप निबंधक, सहकारी संस्था, के पश्चिम विभाग, मुंबई |
| लाचेची मागणी | रू. ४,००,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रु. २,००,०००/- (पहिला हप्ता) |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे एका गृहनिर्माण सोसायटीचे खजिनदार होते. त्यांनी सदर सोसायटीचे सचिव यांना बेकायदेशीर कामाबाबत जाब विचारला असता, त्यांनी तक्रारदार यांना खजिनदार या पदावर काढून टाकले होते. तक्रारदार यांनी त्यांना कमिटीतून काढून टाकणे, नविन सदस्यांची नेमणूक करणे तसेच त्यांची सोसायटीची कमिटी हि बेकायदेशीर कामे करीत असून सोसायटी कायदयाप्रमाणे काम करीत नसल्याने सदरची सोसायटी कमिटी रद्द करण्याबाबत तक्रार अर्ज उपनिबंधक सहकारी संस्था, 'के' पश्चिम विभाग, वांद्रे (पुर्व), मुंबई येथे केला होता. त्याअनुषंगाने नमूद कार्यालयाने तक्रारदार यांना पुन्हा कमिटीवर घेण्याबाबत आदेश पारित केला होता. परंतू नमूद गृहनिर्माण सोसायटीचे सचिव व सोसायटी यांचेवर कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी सदरबाबत उप निबंधक, सहकारी संस्था, के पश्चिम विभाग, मुंबई या कार्यालयात जावून चौकशी केली असता, लोकसेवक सुनिल कोठावळे व विकास कोरडे यांनी तक्रारदार यांच्या तक्रारअर्जावर कारवाई करण्याकरीता तक्रारदार यांच्याकडे रू. ४,००,०००/- लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांना लोकसेवकांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २४/०४/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे समक्ष येवून लेखी तक्रार दिली.<br><br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २८/०४/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक विकास रामचंद्र कोरडे यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांच्या कामाकरीता रू. ४,००,०००/- इतक्या लाचेची मागणी करून त्यातील पहिला हप्ता म्हणून रू. २,००,०००/- लाचेची मागणी करून स्विकारण्याचे कबूल केल्याचे निष्पन्न झाले. त्याअनुषंगाने दिनांक १९/०५/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांना तक्रारदार यांचेकडून लाचेचा पहिला हप्ता म्हणून रक्कम रू. २,००,०००/- स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणुन त्यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**तपास अधिकारी :- श्री. हेमंत नागरे, पोलीस निरीक्षक** **पर्यवेक्षक अधिकारी :- श्री. निरज उबाळे, सहाय्यक पोलीस आयुक्त**

मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण,. अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र गणपत सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( अनिल घेरडीकर )
अपर पोलीस उप आयुक्त (१),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोलफ्री क्र.** १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट** :– acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :– acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :– addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :– www.facebook.com - Maharashtra ACB **मोबाईल ॲप** :– www.acbmaharashtra.net

Scanned with OKEN Scanner